क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३४८/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ३२८ दिनांक २५ / ०१ / २०११

विषय : शासन व्यवहारात मराठीचा वापर राजभाषा अधिनियमातील तरतुदींकडे दुर्लक्ष करणाऱ्यांविरुध्द कडक कारवाई करण्याबाबत.

संदर्भ : शासन परिपत्रक क्र.मभावि-२०१०/प्र.क्र.२३१/१०/२०-ब, दिनांक १ डिसेंबर २०१०

.....

प्रशासकीय दैनंदिन कामकाज अपरिहार्यता वगळता एरवी मराठी भाषेतुनच करण्याचे महाराष्ट्र शासनाचे प्रशासकीय धोरण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीनेही अवलंबिले आहे. आतापर्यंत विविध प्रशासकीय परिपत्रकान्वये वेळोवेळी मराठी भाषेच्या वापराविषयी सूचना जारी केल्या आहेत.

२. वर्जीत प्रयोजने वगळता इतर बाबतीत संयुक्तिक कारणे नसताना राजभाषा मराठीचा वापर करण्यास जे अधिकारी/कर्मचारी टाळाटाळ करतात अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्याबाबत तसेच वारंवार समज देऊनही जे अधिकारी/कर्मचारी राजभाषेचा वापर करण्याच्या नियमांचे पालन करणार नाहीत त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतच्या शासनाकडून देण्यात आलेल्या सूचना वेळोवेळी प्रशासकीय परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

३. अद्यापही वर्जीत प्रयोजने वगळता इतर बाबतीत राजभाषा मराठीचा वापर करण्यास अधिकारी/कर्मचारी टाळाटाळ करतात. त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतच्या सूचना सदर शासन परिपत्रकान्वये पुन्हा देण्यात आल्या आहेत. या संदर्भात कक्ष अधिकारी, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र-क्र.संकीर्ण-२०११/ सं.क्र.१/ प्रशा-२ दिनांक ०३.०१.२०११ च्या पत्रासोबत प्राप्त झालेल्या शासन परिपत्रक क्र.मभावि-२०१०/प्र.क्र.२३१/१०/२०-ब, दिनांक १ डिसेंबर २०१० ची प्रत सोबत जोडली आहे.

४. सर्व संबंधितांना विनंती करण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०१.१२.२०१० च्या शासन परिपत्रकातील आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरील प्रमाणे.

25/1/2011

**(विजय भि. बागुल)**
**मुख्य महाव्यवस्थापक (क)**

प्रति,
प्रेषण यादीप्रमाणे विभागीय कार्यालय स्तरापर्यंत व
निगम कार्यालयातील सर्व विभागप्रमुख व कक्षप्रमुख.

*D:\O&M\Adm Cir.F.N.348-Marathi Bhasha.doc*
*25/1/11*

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र.: २२७९३७२१, २२८१०३९४
फॅक्स क्र. : २२८२४४४६, २२०४५९६९
ईमेल आयडी: ielddo_adm2@maharashtra.gov.in,
ield_ad.2@rediffmail.com

क्र.संकीर्ण-२०११/सं.क्र.१/प्रशा-२,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०३/०१/२०११.

प्रति,

सर्व उप सचिव,
सर्व अवर सचिव,
सर्व कक्ष अधिकारी,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**विषयः- शासन व्यवहारात मराठीचा वापर राजभाषा अधिनियमातील तरतूदींकडे दुर्लक्ष करणाऱ्यांविरुध्द कडक कारवाई करण्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयासंबंधातील सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.मभावि-२०१०/प्र.क्र.२३१/१०/२०-ब, दिनांक १ डिसेंबर, २०१० ची प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,

( कृ. जो. मेंगाणे )
कक्ष अधिकारी.

सोबतः- वरीलप्रमाणे.
प्रत,

१. सचिव (लघु व मध्यम उद्योग) तथा पदसिध्द विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,मुंबई.
२. संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री, चर्नीरोड स्टेशन जवळ, नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४.
३. संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, जुने सचिवालय, सिव्हील लाईन, पोस्ट बॉक्स नं.१११, नागपूर- ४४०००१.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९३.

C:\2011\Other\RN.1-2011.doc

५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, युनायटेड इंडिया इमारत, पहिला माळा, सर फिरोजशहा मेहता रोड, फोर्ट, मुंबई -४००००१.
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित,२१४ न्यु मरीन चेंबर्स, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठासमोर, ४३, न्यु मरीन लाईन्स, मुंबई -४०००२०.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४००००१.
८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, कृपानिधी, ९, वालचंद हिराचंद मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४००००१.
९. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ,प्लॉट नं.७,अजनी चौक,वर्धा रोड,नागपूर-१५.
१०. व्यवस्थापकीय संचालक, कोकण विकास महामंडळ मर्यादित, युनिट क्र.१६, आरे दुग्ध वसाहत, गोरेगांव (पूर्व), मुंबई-४०००६५.
११. व्यवस्थापकीय संचालक, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, दुसरा मजला, कुबेरा चेंबर्स, डॉ.राजेंद्र प्रसाद पथ, संचेती हॉस्पीटल समोर, शिवाजीनगर, पुणे -४११००५.
१२. व्यवस्थापकीय संचालक, मराठवाडा महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, विकास भवन, डॉ.राजेंद्र प्रसाद मार्ग, औरंगाबाद-४३१००१.
१३. व्यवस्थापकीय संचालक, विदर्भ महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, महाजन बिल्डिंग, मेन रोड, सिताबर्डी, नागपूर-४४००१२.
१४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित, प्लॉट नं. एएम-३, MIDC, क्रॉस रोड-A,मरोल इंडस्ट्रीयल एरिया, अंधेरी (पू), मुंबई- ४०० ०९३.
१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत धारक कं. लि.प्रकाशगड,वांद्रे (पू),मुंबई-५१.
१६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मीती कं. लि.प्रकाशगड,वांद्रे(पू),मुंबई-५१.
१७. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं.लि.प्रकाशगड,वांद्रे (पू),मुंबई-५१.
१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि.प्रकाशगंगा,१ला मजला, प्लॉट नं.सी-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू),मुंबई-५१.
१९. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, म्हाडा कमर्शियल कॉम्प्लेक्स, स.न.१९१-ए, फेज-८ त्रिदलनगर समोर, येरवडा, पुणे -४११००६.
२०. सचिव,महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर नं.१, १३ वा मजला,कुलाबा,मुंबई-५.
२१. मुख्य अभियंता(विद्युत),प्रशासकीय इमारत, तिसरा मजला,रामकृष्ण चेंबुरकर मार्ग,चेंबूर,मुंबई- ४०००७१.
२२. कामगार आयुक्त,कामगार भवन,भूखंड क्र.सी-२०,ब्लॉक-इ, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा(पूर्व),मुंबई-५१,
२३. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, कामगार भवन, ५ वा मजला, ब्लॉक-ई, भूखंड क्र.सी-२०, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१,
२४. संचालक, बाष्पके, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, कामगार भवन, सातवा मजला, भूखंड क्र.सी-२०, ब्लॉक-इ, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१,
२५. प्रबंधक, औद्योगिक न्यायालय,प्रशासकीय इमारत, पहिला मजला, वांद्रे (पूर्व),मुंबई-४०००५१.
२६. संचालक, कै. नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, दादाभाई चमारबागवाला मार्ग, परेल, मुंबई- ४०० ०१२.
२७. कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ , हुतात्मा बाबु गेनू, मुंबई गिरणी कामगार क्रिडा भवन, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, मुंबई-४०००१३.

**शासन व्यवहारात मराठीचा वापर --**
**राजभाषा अधिनियमातील तरतुदींकडे दुर्लक्ष**
**करणाऱ्यांविरुध्द कडक कारवाई करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : मभावि-२०१०/प्र.क्र.-२३१/१०/२०-ब,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक : १ डिसेंबर, २०१०.**

**संदर्भ :-** १) शा.प. सा.प्र.वि. क्र. : मभावा-१०८०/प्र.-५४/२०, दिनांक १८ मे, १९८२.
२) शा.नि.सा.प्र.वि. क्र. : मभावा-१०८०/४३४/प्र.१६१/८६/वीस-ब, दि. १८ जुलै, १९८६.
३) शा.नि.सा.प्र.वि. क्र. : संकिर्ण-१०८८/४६०५/१९, दि. ३० डिसेंबर, १९८८.
४) शा.प.सा.प्र.वि. क्र. : मभावा-२०१०/प्र.क्र.७५/२०-ब, दि. १४ जुलै, २०१०.

परिपत्रक

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर शासनाने मराठीतून राज्य कारभार करण्याचे धोरण जाहीर केले आहे. सदर धोरणानुसार दिनांक २६ जानेवारी, १९६५ पासून मराठी ही राज्याची राजभाषा म्हणून घोषित करण्यांत आली आणि महाराष्ट्रात राजभाषा अधिनियम,१९६४ मधील तरतुदींनुसार दिनांक १ मे, १९६६ पासून वर्जित प्रयोजने वगळता सर्व कामकाज मराठीतून करणे बंधनकारक करण्यांत आले आहे. शासकीय कार्यालयांप्रमाणे शासनाच्या अंगिकृत व्यवसायांनी वर्जित प्रयोजने वगळता सर्व कामकाज मराठीतून करावयाचे आहे व या आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी म्हणून या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी शासन परिपत्रके, शासन निर्णय याद्वारे सूचनाही देण्यांत आलेल्या आहेत. तथापि, अद्यापही शासनाची काही कार्यालये / अंगिकृत व्यवसायांकडून कार्यालयाचे कामकाज १०० टक्के मराठीतून होत नसल्याचे निदर्शनास येत आहे. उपरोक्त संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णय, दिनांक ३० डिसेंबर, १९८८ नुसार शासन व्यवहारात मराठीचा वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना सूचना देण्यांत आल्या आहेत.

२. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, अद्यापही काही शासकीय कार्यालयांमध्ये वर्जित प्रयोजने वगळता इतर बाबतीत सयुक्तिक कारणे नसताना राजभाषा मराठीचा वापर करण्यास अधिकारी व कर्मचारी टाळाटाळ करतात. (उदा. शासनाकडून निर्गमित केलेले / करण्यांत येणारे शासन निर्णय, शासन परिपत्रक, महाराष्ट्र शासन राजपत्र इ. वरील अधिकाऱ्यांची नांवे ही मराठी उच्चाराच्या आद्याक्षरात नसून

इंग्रजी उच्चाराच्या अद्याक्षराप्रमाणे असतात.) अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्याबाबत तसेच, वारंवार समज देऊनही जे अधिकारी / कर्मचारी राजभाषेचा वापर करण्याच्या नियमांचे पालन करणार नाहीत त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतच्या सूचना सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना देण्यांत आल्या आहेत. असे असूनही सदर बाबीकडे दुर्लक्ष होणे ही बाब गंभीर आहे. सबब, या संदर्भात संदर्भाधीन शासन निर्णय व परिपत्रकांकडे लक्ष वेधण्यात येत असून सदर आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे अशा सूचना पुन्हा देण्यांत येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यांत आलेले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१०१२०१२०३८५२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( गो. ग. आल्हाट )
उपसचिव, महाराष्ट्र शासन,

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
सर्व विभागीय आयुक्त,
मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई.
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, विधान भवन, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
भाषा संचालक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय सहाय्यक भाषा संचालक, नवी मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद.
निवड नस्ती (२०-ब).